
2021-22

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८



लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान

- प्रोफेसर डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०८

वामन तबाजी कर्डक ऊर्फ वामनदादा यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी देशवंडी ता. सिन्नर जि. नाशिक येथे एका सामान्य कुटुंबात झाला. ते वामनदादा या टोपणनावाने विशेष प्रसिद्ध होते. विशेषत: आंबेडकरी शाहीर कवी आणि साहित्यिक, गीतकार म्हणून त्यांची विशेष ख्याती होती. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते म्हणूनही ते ओळखले जात होते. अनुसया आणि शांताबाई या त्यांच्या जोडीदार होत्या मीरा ही मुलगी जगू शकली नाही. दत्तकपुत्र रवींद्र कर्डक हे होते. वडील तबाजी कर्डक, आई सईबाई, मोठा भाऊ सदाशिव तर धाकटी बहीण सावित्री असा त्यांचा परिवार होता. त्यांच्या घरी १८ एकर शेती होती. धान्य घरात यायचे तरीही हंगाम संपला की आईने डोंगरात जाऊन लाकडे गोळा करून मोळी बांधून ते सिन्नरच्या बाजारात विकणे, वडील टेंभुर्णीच्या पानाच्या विड्या करून विकणे, हेडीचा धंदा करणे इ. कामे करूनही संसाराची आबाळ होत असत. वामनदादांनी लहानपणी अनेक प्रकारची कष्टाची विविध कामे केलीत. उदा. गुरे चारणे, कुस्त्या खेळणे, गिरणी कामगार, मातीकाम, सिमेंट काँक्रिटचे काम, चिक्की विकणे, ऑईसफ्रूट विकणे, खडी फोडणे, टाटा ऑईल मिलमध्ये नोकरी, कोळसा वखारीत काम इ. कामे करून आयुष्यभर कष्टार्जित जीणे जगले.

वामनदादांना अक्षरओळख नव्हती; परंतु शिवडीच्या बीडीडी चाळीत राहत असताना ते समता सैनिक दलात सामील झाले. आपणास वाचता येत नाही ही खंत त्यांच्या मनाला होती. याचे बाईट वाटू लागत होते. यावर मात करण्यासाठी ते देहलवी नावाच्या मास्तरांकडून बाराखडी, मुळाक्षरे शिकले. जोडाक्षरे दुकानाच्या पाट्या, बोर्ड वाचून शिकले. नंतर त्यांचे लेखन, वाचन वाढू लागले. विविध खेळ आणि व्यायामही ते करत असत. या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ प्रगतिपथावर होती. समता सैनिक दलाच्या माध्यमातून बाबासाहेबांचे अनुयायी समतेच्या लढ्यात उतरले होते. वामनदादाही यात अपवाद नव्हते. वामनदादा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेला जात होते नायगाव येथे १९४३ साली वामनदादा कर्डक यांनी बाबासाहेबांना प्रथम पाहिले होते. तेथून पुढे संपूर्ण जीवनभर वामनदादा आंबेडकरी चळवळीत अग्रस्थानी राहिले. वामनदादांना चित्रपट कथाकार, अभिनेता होण्याची इच्छा होती. यासाठी त्यांनी अनेक चित्रपट कंपन्यांमध्ये भेटी दिल्या. मिनव्हा फिल्म कंपनीत एक्ट्रा म्हणून प्रवेश मिळाला होता. ते कारदार स्टुडिओ, रणजीत स्टुडिओ यामध्येही कामाला जायचे. १९४३ मध्ये राणीबागेत बसले असताना त्यांना पहिल्यांदा हिंदी गीताचे विडंबन गीत करायचे सुचले आणि ते त्यांनी३ मे १९४३ रोजी चाळीतील लोकांसमोर गाऊन दाखवले. हा वामनदादांच्या कवी, गीतकार होण्याचा मुळारंभ होता. साधारणपणे

१९४३ ते २००४ पर्यंत वामनदादांनी गीतलेखन आणि गीत गायनाचे सर्वदूर कार्यक्रम केले. त्यांची प्रकाशित आणि अप्रकाशित मिळून साधारणत: दहा हजार गीतरचना आहे. त्यांनी काही चित्रपटगीतेही लिहिलेली आहेत. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक भाषणांच्यादरम्यान गीत, कवितांचे वाचन केले आहेत.

वामनदादांनी 'वाटचाल'१ गीतसंग्रह-१९७३, 'मोहळ' गीतसंग्रह – १९७६, 'हे गीत वामनाचे' गीतसंग्रह – १९७७, 'माझ्या जीवनाचं गाणं' आत्मकथन - १९९६ इत्यादी साहित्यसंपदना त्यांच्या नावावर आहे याशिवाय 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट, 'भीमज्योत', 'जयभीम गीते', 'सांगा या वेडीला माझ्या गुलछडीला', 'चल गं हरणे तुरू तुरू इ. ध्वनिफित व चित्रपटगीते वामनदादांनी लिहिलेली आहेत. लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्यांची चळवळ आपल्या ओजस्वी वाणीतून आणि क्रांतिकारीगीते, लेखनातून महाराष्ट्राच्या घराघरांत, खेडोपाडी, वाडी, तांड्यात पोहोचविण्याचे काम अत्यंत प्रखर निष्ठेने केलेले आहेत गौतम बुद्ध, महात्मा पुâले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ.चे विचार वामनदादांचा श्वास होता. हाच विचार शेवटपर्यंत ते गाऊन जगले. हे महापुरुष त्यांचे ऊर्जावेंâद्र होते. आंबेडकरी विचारांचे प्रसारक, प्रचारक म्हणून ते निष्ठेने वावरले.

शाहीर कवी किसन फागूजी बनसोडे, शाहीर घेगडे, सोनुले, बाळकृष्ण वासनिक, ना. रा. शेंडे, लखमापूरकर, मधू कोसारे इ. कवींबरोबर वामनदादांनी आपली कविता, गीते रचून दलितांचा मुक्तिलढा प्रज्वलित केलेला होता. इतर शाहीर कवींप्रमाणे ते आपली कविता घेऊन दलितांच्या झोपड्याझोपड्यांतून गेले ते आपल्या कवितेमागची भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, ''मी जेथे जन्मलो, ज्या जातीत वाढलो आणि ज्या अन्यायाखाली भरडला गेलो त्याची मला आठवण आहे. ती वैâफियत मी शब्दात मांडतो. त्याला तुम्ही कविता म्हणा विंâवा म्हणू नका. मला जे प्रामाणिकपणे जाणवले ते मांडले.''२ वामनदादांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर असीम व प्रखर श्रद्धा होती बाबासाहेबांच्या नेतृत्वावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच वामनदादांनी दलितांच्या मनत जळजळीत अंगार पेटविला. ते म्हणतात –

''तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊसधारा मुळी न आम्ही शिवे''

क्रांतीची विद्रोही गीते गाणारे वामनदादा डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर अस्वस्थ होतात स्वातंत्र्योत्तर काळात दलित जातीवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारामुळे ते सुन्न होतात या अन्याय-अत्याचाराविरोधात दलित मन चिडत का नाही, पेटून उठत का नाही? अशी ते खंत व्यक्त करतात. वामनदादांच्या मनातील प्रचंड कादळ चित्रित करताना दलित साहित्याचे समीक्षक डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''भीमरावाच्या समद्ध मळयाला आलेली अवकळा पाहून कवी विषण्ण होतो. पोटच्या लेकरागत ज्याला राखला, करुणेची झारी घेऊन जिथे एकेका रोपावर जलसिंचन केले, तो मळा आता दुहीने पेटलेला आहे. एकीचा जोंधळा आता वाळून चालला आहे. कवीने व्यक्त केलेल्या ह्या भावना संवेद्य आहेत. भीमापाठी अन्यायाने पुन्हा उसळी मारली आहे. लेकी-बहिर्णींची अब्रू बेदरकारपणे लुटली जात आहे. घरे जाळली जात आहेत. निर्घृण छळ चाललेला आहे. पण सारेच मूग गिळून बसत आहेत. चीडच नष्ट झाली आहे.''३ वामनदादांची कविता म्हणजे मनात ठसठसत असलेले दुःख, संवेदनशील मनाचे आवेग असतात. ते म्हणतात –

''भीम माझ्यामध्ये होता, मान ताठ होती माझी
माझ्यातला भीम इथे, मीच उणा, दोष देऊ कुणा?''

असे कवी आपले आपण स्वपरीक्षण करतात. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर दलित समाजाला पोरकेपणा जाणवतो. प्रत्येक दलित कवी मन बाबासाहेबांबद्दल कृतज्ञतेने भरलेले आहे. दादरच्या चैत्यभूमीवर उभे राहताना वामनदादांच्या मनात येते –

''समाधीकडे त्या वाट ही वळावी
तिथे आसवांची पुâलेही गळावी
जिथे माऊलीची चिता ही जळाली

धूळ त्या स्थळाची मस्तकी मळावी.''

बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर अशी भावनिक साद वामनदादा आपल्या कवणातून घालतात वामनदादांच्या गीतांची प्रेरणाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे तत्त्वज्ञान होती या संदर्भात महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे वामनदादांच्या गीतातील प्रेरणेबद्दल म्हणतात की, ''वामनदादांच्या बोलण्यात भीम वागण्यात भीम, जगण्यात भीम, गाण्यात भीम, श्वासाच्या प्रत्येक श्वासात भीम, लढण्यात भीम, प्रत्येक प्रश्नांच्या इलाजात भीम विचारांच्या प्रसारासाठी आणि समाजाला घडवण्यासाठी आहे. या न्यायाने ते जगले. शब्द भीमाचे, आवाज भीमाचा, जगण्याची प्रेरणा भीमाची, स्वाभिमानी जगाची निर्मितीही भीमाची अशा प्रकारे वामनदादांच्या जीवनाचा कणन्कण अवघा भीममय होऊन गेला होता.''[४] बाबासाहेबांच्या विचारांशी एकमय होणं हे वामनदादांकडे होते. आंबेडकरी विचार त्यांचा श्वास होते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हेच आपल्या कविता व गीतरचनेची निर्मिती प्रेरणा आहे. उदा.

''भीमवाणी पडली माझ्या कानी
तीच वाणी ठरली माझी गाणी''[५]

आपल्या काव्याची स्फूर्ती सांगताना वामनदादा म्हणतात की,

''जे बोल भीमाचे आठवले, सारेच अंतरी साठवले।
नव्हते माझे ते ते सारे, आपुलेसे करूनी पाठवले।
त्या कोटी बाळांना हे बाळकडू मी चाटवले''[६]

बाबासाहेबांच्या विचारांचे बाळकडू कोट्यवधी लोकांच्या मनात साठवण्याचे महान कार्य वामनदादांनी केले आहे हेच या सर्वच कवितेतून स्पष्ट होते. 'माझ्या जन्मापासून' या आपल्या गीतात वामनदादा कर्डक आपल्या जीवनाचा पट मांडताना म्हणतात –

''माझ्या जीवनापासून लोक सारंच पाहत आले,
बाळवत्यातला वामन, सावकाराच्या शेतातला
तीन लाकडाच्या झोळीतला वामन
उन्हाचे चटके खाणारा वामन
गुरे चारताना, डोंगर, दरी कपारी चढणारा वामन
मुंबई पाहणारा वामन, कोळसा वेचणारा वामन
माती उपसणारा वामन, महाराष्ट्राचा वामन
महाराष्ट्राबाहेरील वामन
सुरत, भोपाळ, हैदराबाद, कर्नाटकपर्यंत गेलेला वामन
दिल्लीचा आणि महाराष्ट्रातील अनेक पुरस्कार घेतलेला वामन
बुद्ध, पुढ्ले, आंबेडकरांची कास धरणारावामन
देव, दैव, आत्मा, पुनर्जन्म नाकारणारा वामन
बारा, तेरा, चौदा, पंधरातला
पन्नास, साठ, सत्तर चौऱ्याहत्तर पर्यंत पोहोचलेला वामन
लोक पाहत आलेत,
आज शरपंजरी पडलेला वामन
लोक पाहत आहेत
लोक पाहत आहेत.''[७]

अशी वामनदादांची विविध रूपे आणि या रूपातील त्यांचे कर्तृत्व केवळ महाराष्ट्र भूमीपुरते मर्यादित नव्हते. वामनदादांच्या कार्याची व्याप्ती राष्ट्रीय स्वरूपाचीच होती. हे वरील काव्यातून लक्षात येते. बाबासाहेबांमुळेच या देशातील अस्पृश्य समाज गुलामीचे जीवन नाकारून सन्मानाने जगू लागला आहे. अस्पृश्य समाजातील अज्ञान, काळोखावर मात करणे हे बाबासाहेबांमुळेच शक्य झाले आहे. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वामुळेच अस्पृश्यांच्या घरात ज्ञान, शिक्षण पोहोचले. यासंदर्भात वामनदादा म्हणतात,

''उद्धरली कोटी कुळे
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।धृ।।
जखडबंद पायातील साखळदंड
तडातड तुटले तू ठोकताच दंड
झाले गुलाम मोकळे
भीमा तुझ्या जन्मामुळे''[८]

वामनदादांनी अत्यंत भाव आणि हृदयस्पर्शीपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी नातेसंबंध कल्पिलेले आहे यासंदर्भात वामनदादांच्या कवितेचे अभ्यासक डॉ. भास्कर नरवाडे म्हणतात की, ''वामनदादा कर्डकांनी हृदयस्पर्शी वाटणाऱ्या आईच्या रूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पाहिले. भीम नव्हे ही तर माझी भीमाई, भीमाई म्हणजे सातकोटी बहिष्कृतांची आई, आपल्या पिल्लांना चालायला, बोलायला आणि अन्यायाविरुद्ध लढायला शिकविणारी आई, भीमाई ही जन्मदात्या आई इतकीच, विंâबहुना तिच्यापेक्षाही श्रेष्ठ आहे. जन्मदाती आई फक्त तिच्या पोटी जन्मलेल्या मुलाची आई होते पण भीमाई सर्व उपेक्षित समाजाची आई होते.''[९] असे भीमाईचे रूपक वामनदादांनी कल्पून अस्पृश्य समाजाचे मातृत्व डॉ. बाबासाहेबांना बहाल केले आहे. म्हणूनच वामनदादा भीमाईचे गुणगान करताना म्हणतात,

''चोचीतला चारा देत होता सारा
आईचा उबारा देत होता सारा
भीमाई परी चिल्यापिल्यावरी
पंख पांघराया होता माझा भीमराया
माऊलीची माया होता माझा भीमराया.''[१०]

असे माऊलीचे रूपक वापरले आहे. 'माऊली' या रूपकाला जो परंपरागत आणि आध्यात्मिक अर्थ आहे. त्यापेक्षा अभिनव आणि क्रांतिकारी 'भीमाई'चे रूपक वामनदादांनी वापरले आहे. या रूपाबद्दलच वामनदादा म्हणतात की,

''काय सांगू तुला आता भीम माझा कसा होता
लेकराला जशी माता, भीम माझा तसा होता.''[११]

लढाऊ बाण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा वामनदादांनी वीररसाचे प्रतिपादन करून रेखाटली आहे उदा.

''वादळी वाऱ्यामधी तोफेच्या माऱ्यामधी
पाहिला भीम आम्ही रणी लढणाऱ्या मधी ।।धृ।।''[१२]

वामनदादा कर्डक आपल्या कविता व गीतांतून केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महान प्रतिमा तर शब्दबद्ध करतातच परंतु या देशातील भांडवलशाही आणि तिचे आर्थिक शोषणाचेही चित्रण करतात. बाबासाहेबांच्या स्वप्नप्रतिमेतच त्यांची लेखणी अडकत नाही. सामाजिक समतेसाठी आर्थिक विषमता संपली पाहिजे, यासाठीच वामनदादा या देशातील कष्टकरी, कामगार, अस्पृश्य समाजाच्या हिताची बाजू घेतात. या देशातील सर्व प्रकारच्या संपत्तीचे जे वेंâद्रीकरण झालेले आहे त्याचे विवेंâद्रीकरण होण्यासाठी संपत्तीच्या फेरवाटपाची मागणी करताना ते म्हणतात –

''सांगा आम्हाला बिर्ला बाटा

टाटा कुठायं हो
सांगा धनाचा साठा आमचा
आमचा वाटा कुठाय हो... ॥धृ॥
घाम शेतात आमचा गळं, चोर ऐतच घेऊन पळं
धनचोरांचा हा पळण्याचा फाटा कुठाय हो...॥१॥
लोणी सारं तिकडं पळं इथे भुकेनं जीव डाजळं
दुकानवाले दादा आमचा आटा कुठाय हो ॥२॥''[१३]

असे समाजवारी तत्त्वज्ञान वामनदादा आपल्या गीतातून सोप्या भाषेत मांडतात. आज वामनदादांचे हे गीत कष्टकरी-कामगार-शेतकरी या सर्वांच्या संघटना पातळीवर क्रांतिकारी आणि चळवळीला प्रेरणा आणि उभारी देणारे हेगीत ठरले आहे.

वामनदादा कर्डक यांच्याबद्दल प्रा. अरुण कांबळे म्हणतात की, ''दलित मुक्तीच्या लढ्याच्या इतिहासात वामन कर्डकांचे नाव 'भीमशाहीर' म्हणून सुवर्णाक्षरात लिहिले जाईल. डॉ. आंबेडकरांनी या देशात पुन्हा नव्याने उभी केलेली बुद्ध कबीर, महात्मा पुâले, छत्रपती शाहू महाराज ही समतेची परंपरा वामनदादांनी आपल्या गाण्यांमधून मनामनात पोहोचविली या कामी ते आयुष्यभर मिशनरीवृत्तीने खपले. कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता, उपेक्षेचे दु:ख न बाळगता, चोखोबा-तुकोबांसारख्या निरिच्छेतेनं त्यांनी आपली ही समतेची पालखी खांद्यावआयुष्यभर वाहिली.''[१४]

वामनदादा कर्डक आपल्या गीतांतून मानवमुक्तीचा विचार करतात आंबेडकरी विचारातील मानवतावाद त्यांनी आपल्या पुढील गीतातून व्यक्त केलेला आहे. उदा.

''माणसा इथे मी तुझे गीत गावे
तुझी गीत गावे तुझे हित व्हावे
असे गोड नाते तुझ्याशी जडावे
तुझ्या संकटाशी इथे मी लढावे.''[१५]

याशिवाय वामनदादांनी सम्यक क्रांतीचा विचार आपल्या गीतांतून कवितेतून मांडला आहे वामनदादांच्या समकालीन शिक्षण, धार्मिक तत्त्वज्ञान, जातीयता, सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञान, आर्थिक व मानवतावादी तत्त्वज्ञान, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता, स्त्रीमुक्ती इ. अनेक विषयांवर गीतांतून भाष्य केले आहे राजकीय बेबनाव, दलित ऐक्य, पुâटीरता, गटतट, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायी वर्गाची उक्ती आणि कृतीतील विसंगती यावर वामनदादांनी अतिशय मार्मिक भाष्य आपल्या गीतातून केले आहे. उदा.

''वाणीत भीम आहे करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिल्लांचे सारेच चोख असते''[१६]

निरीक्षणे :

१) वामनदादा कर्डक हे डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे प्रचारक प्रसारक होते.
२) वामनदादांनी आपल्या गीतातून गौतम बुद्ध संत कबीर, महात्मा पुâले, कार्ल मार्क्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक समतेचे विचार मांडले.
३) वामनदादांनी मानवमुक्तीच्या लढ्याचे गुणगान आपल्या गीतातून केले
४) वामनदादा अत्यंत खडतर परिस्थितीतून जीवन जगले म्हणून ते जीवनाचे गाणे गातात.
५) वामनदादा आपल्या गीतातून भूक, दारिद्र्य, अस्पृश्यता, शोषण, दलित ऐक्य, दलित चळवळीतील विविध गट-तट इ.चे चित्रण करतात.
६) स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय इ. भारतीय संविधानातील मूल्यांची वामनदादा पाठराखण करतात

७) भारतीय राज्यघटनेतील मूल्यविचार समाजव्यवस्थेत रूजला पाहिजे. याची पखरण ते आपल्या कविता, गीतांतून करतात.

८) वामनदादा कर्डक हे समतेचे पाईक, सैनिक ठरतात.

९) समतावादी विचारांची पालखी वाहणारे वामनदादा पालखीचे वाहक ठरतात.

१०) वामनदादांची गीते, कविता क्रांतिकारी, प्रबोधनात्मक, संविधान मूल्यांचा प्रसार करणारी आहे या गीतात गेयता कलात्मकता आहे.

संदर्भसूची :

१) विकिपीडिया – https://mr.wikipedia.org/s/3rgt

२) 'दलित साहित्य – वेदना व विद्रोह', भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, नोव्हेंबर २०००, पृष्ठ क्र. ११६.

३) उपरोक्त – पृष्ठ क्र. ११६.

४) 'वामनदादांच्या गीतांतील भीमदर्शन', उत्तम कांबळे, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००५, पृष्ठ क्र. ७.

५) 'महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड-१', संपा. गायकवाड, जाधव, आलोक – संबोधी प्रकाशन, यवतमाळ, प्र.आ. २०१४, पृष्ठ क्र. २३४.

६) 'तुफानातले दिवे', वामनदादा कर्डक, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २००९, पृष्ठ क्र. १२.

७) 'मोहळ', वामन कर्डक, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, २०११, पृष्ठ क्र. ९१.

८) तत्रैव, पृष्ठ क्र. ०९.

९) 'वामनदादा कर्डक यांच्या गीतकाव्यातून येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान – स्वरूप आणि चिकित्सा', (अप्रकाशित प्रबंध), डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३०३.

१०) उपरोक्त, डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३०३.

११) उपरोक्त, डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३०४.

१२) उपरोक्त, डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३०४.

१३) उपरोक्त, डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३७२, ३७३.

१४) उपरोक्त, डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३७५, ३७६.

१५) उपरोक्त, डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३८१.

१६) उपरोक्त, डॉ. भास्कर नरवाडे, अहमदपूर, पृष्ठ क्र. ३५८.

◆◆◆◆◆